● वर्ष : ०३ ● अंक : ०११ ● पुणे ● मंगळवार, दि. २२ सप्टेंबर २०२५ ● मराठी दैनिक ● पाने ४ ● किंमत : २ रूपये ● RNI No.-MAHMAR/2023/89313



# पावसाचा कहर; बचाव कार्यासाठी लष्कराची मदत

**छत्रपती संभाजीनगर (दै. आरंभ पर्व)**

मराठवाड्यातील काही भागांत रविवारी रात्रीपासून पावसाने पुन्हा कहर केला. धाराशिव जिल्ह्यातील परंडा, बीडमधील पाटोदा, शिरूर, जालना शहर यांसह बहुतांश भागांत मुसळधार पावसाने पूरस्थिती निर्माण झाली. अनेक गावांचा संपर्क तुटला. ग्रामीण भागातील वाहतूक विस्कळीत झाली. नदी – नाल्यांना पूर आला.

गेल्या २४ तासांत चार जणांचा मृत्यू झाला. तर ७२ जनावरे दगावली आहेत. ८५ महसूल मंडलात अतिवृष्टीची नोंद झाली. पिके पाण्यात गेली आहेत. तर उत्तर महाराष्ट्रात जळगावमध्ये एक जण वाहून गेला

परंडा तालुक्यातील ढगपिंपरी, वडनेर या गावातून नागरिकांना बाहेर काढण्यासाठी लष्कराला पाचारण करावे लागले. सायंकाळपर्यंत २७ जणांना बाहेर काढण्यात आले तर आणखी १५० जण अडकलेले आहेत. याच तालुक्यात घरात पाणी शिरून ७० वर्षांच्या देवांगनाबाई नवनाथ वारे यांचा मृत्यू झाला.

धाराशिव जिल्ह्यातील परंडा तालुक्यात पिंपळगाव येथील गोठ्यात बांधलेल्या २० गायी पुरामुळे दावणीला दगावल्या. भूम तालुक्यातील तीन गावांतील सहा कुटुंबांतील एकूण १४ जणांना पुराच्या पाण्यातून हेलिकॉप्टरद्वारे सुरक्षित बाहेर काढले. परंडा तालुक्यातील वागेगव्हाण, वडनेर आदी परिसरात अडकलेल्या नागरिकांना दिलासा देण्यासाठी राष्ट्रीय आपत्ती निवारण पथक व सैन्य दलातील जवान प्रयत्न करत होते. चांदणी, उलका, उल्फा या नद्यांना महापूर आला. रुई, दुधी, ढगपिंपरी, देवगाव (खु.), वडनेर, आवारपिंपरी, वागेगव्हाण परिसरातील नदीकाठी व वस्त्यांवर राहत असलेले अडीचशे ते तीनशेजण पाण्यात अडकल्याने या नागरिकांना सुखरूप बाहेर काढण्यासाठी प्रयत्न सुरू होते.

**जळगावमध्ये वाहून गेल्याने एकाचा मृत्यू :** जिल्ह्यातील पाचोरा, भडगाव, चाळीसगाव, पारोळा, एरंडोल तालुक्यांत रविवारी रात्री आणि सोमवारी सकाळी जोरदार पाऊस झाला. पाचोरा तालुक्यातील वरखेडी येथील एका शेतकऱ्याचा नाल्यात वाहून गेल्याने मृत्यू झाला. नद्यांच्या पुराचे पाणी पाचोरा शहरासह काही गावांमध्ये शिरल्याने घरांचे तसेच पिकांचे नुकसान झाले.

**सोलापूरात पिकांचे नुकसान :** सोलापूर जिल्ह्यात काही ठिकाणी पावसाने अक्षरशः धुमाकूळ घातल्याचे चित्र आहे. बार्शी, माढा, माळशिरस, पंढरपूर, अक्कलकोट या ठिकाणी मुसळधार पावसाची नोंद झाली आहे. काही ठिकाणी नदी नाले, ओढे भरून वाहू लागल्याने पाणी शेतात, रस्त्यावरून वाहत आहे. यामध्ये माढा तालुक्याला पुराचे संकट आहे. या पावसाने पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.

जालना जिल्ह्यात शेतीचे मोठे नुकसान

जालना जिल्ह्यातील बदनापूर आणि अंबड तालुक्यात झालेल्या मुसळधार पावसामुळे सुखना नदी चौथ्यांदा दुथडी भरून वाहत आहे. गेल्या आठवड्यापासून सुरू असलेल्या या पावसामुळे अनेक नद्यांना पूर आला होता. यामुळे अनेक प्रकल्प पूर्ण क्षमतेने भरले आहेत. मात्र, शेतीत पाणी साचल्यामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे.

तसेच अंबड तालुक्यातील घुंगर्डे हादगाव येथे गल्हाटी नदीच्या पुराचे पाणी गावात शिरले. ज्यामुळे घरे आणि दुकानांमध्ये पाणी घुसले.

याशिवाय, अंबड तालुक्यातील चिकनगाव येथील शाळेच्या प्रांगणाला तळ्याचे स्वरूप आले आहे.

धाराशिव जिल्ह्यात रात्रभर झालेल्या मुसळधार पावसामुळे सर्व शाळांना एक दिवसाची सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. भूम, परंडा आणि कळंब तालुक्यातही जोरदार पाऊस झाला आहे. यामुळे नद्यांना पूर आला असून अनेक रस्ते बंद झाले आहेत. पुराच्या पाण्यात अडकलेल्या 65 लोकांना काल सुरक्षित बाहेर काढण्यात आले. सोलापूर जिल्ह्यात अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवर ग्रामीण भागातील शाळांना सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. यात उत्तर सोलापूर, माढा, करमाळा, मोहोळ, बार्शी आणि दक्षिण सोलापूर तालुक्यातील शाळांचा समावेश आहे.

सोलापूर जिल्ह्यातील सीना नदीच्या पाणी पातळीत मोठी वाढ झाली आहे. सध्या सीना नदीत दोन लाख क्यूसेक वेगाने पाण्याचा विसर्ग सुरू आहे. यामुळे माढा, मोहोळ आणि दक्षिण सोलापूरमधील गावांमध्ये पाणी शिरले असून, वाहतूक विस्कळीत झाली आहे.

लातूर जिल्ह्यात पूरस्थितीमुळे ग्रामीण भागातील 20 हून अधिक रस्ते पाण्याखाली गेले आहेत. ज्यामुळे वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली आहे.

मांजरा, तावरजा आणि तेरणा नद्यांना पूर आला असून, अनेक पूल पाण्याखाली गेले आहेत. लातूर जिल्ह्यात वीज कोसळून दोघांचा मृत्यू झाला. तर एक जण वाहून गेला. लातूर जिल्ह्यातील प्रमुख प्रकल्प 100 टक्क्यांहून अधिक भरले आहेत.

चिपळूण येथील मुंबई-गोवा महामार्गावरील परशुराम घाटात सततच्या पावसामुळे रस्ता खचला आहे. यामुळे वाहतूक विस्कळीत झाली असून, अपघाताची शक्यता वाढली आहे. आधीच एक मार्ग बंद असल्याने उर्वरित एकाच मार्गावरून वाहतूक सुरू आहे, ज्यामुळे वाहनचालकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे.

दैनिक
आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com

## नगर जिल्ह्याला अतिवृष्टीचा पुन्हा तडाखा

**अहिल्यानगर: जिल्ह्याच्या दक्षिण भागाला पावसाने पुन्हा झोडपून काढले. २४ मंडलांत अतिवृष्टी झाली. पाथर्डीत चोवीस तासांत ६.१ इंच (१५५ मिमी) पाऊस झाला. नगर, पाथर्डी, शेवगाव, जामखेड, श्रीगोंदा, कर्जत तालुके पुन्हा जलमय झाले आहेत. शेतीपिकांचे प्रचंड नुकसान झाले. पुरात अडकलेल्या २२७ नागरिकांची सुटका करण्यात आली. पुराचे पाणी लगतच्या वसाहतीत घुसून संसारोपयोगी साहित्याचे मोठे नुकसान झाले. घर पडून ३ जण जखमी झाले.**

## बीडमध्ये संततधार

**बीड जिल्ह्यात पोटदा, आष्टीमध्ये जोरदार पाऊस झाला. बीड तालुक्यातील सात्रा-पोतरा, लंबा-रुई, शिरुर तालुक्यातील ब्रह्मनाथ येळंब, शिरपूर गात. कोळवाडी, महासांगवी, भिल्लवस्ती या गावांचा संपर्क तुटलेला आहे. या गावांतील १५ जणांना आपत्ती निवारण पथकाने सुरक्षितस्थळी हलवले. मांजरा धरणाचे दरवाजे उघडून विसर्ग वाढविण्यात आला आहे.**

## जालन्यातही हजेरी

**जालना जिल्ह्यात सर्वत्र २२ सप्टेंबरच्या मध्यरात्री जोरदार अतिवृष्टी झाली. यामुळे विरेगाव येथील १४ नागरिक पुरात अडकले होते. त्यांना अग्निशमन दलाच्या जवानांच्या साहाय्याने सुरक्षित ठिकाणी हलविले. जालना तालुक्यातील सेवली मंडळात रविवारी रात्री सुमारे ६५ मि.मी. पाऊस पडला. जालना शहरातील रस्ते काही काळ पाण्यात गेले होते. जिल्ह्यातील जालना, अंबड आणि बदनापूर या तीन तालुक्यांतील दहा महसूल मंडलांत अतिवृष्टी झाली. या पावसाने जालना शहरात कुंडलिका नदीच्या पुलावरून पाणी वाहिले.**

## ठळक बातम्या

### अनेक गोष्टी स्वस्त


**नवी दिल्ली (आरंभ पर्व) : नुकत्याच झालेल्या जीएसटी परिषदेच्या महत्त्वाच्या बैठकीत देशातील करप्रणालीत मोठा बदल करण्यात आला आहे. या बैठकीत १२% आणि २८% जीएसटी स्लॅब हटवण्याचा निर्णय घेण्यात आला असून, आता केवळ ५% आणि १८% असे दोनच स्लॅब कायम राहणार आहेत. अन्नपदार्थ, कापड, कार, एसी, टीव्ही यांसारख्या रोजच्या वापरातील व महत्त्वाच्या वस्तूंवरील जीएसटी दरात कपात करण्यात आली आहे.**

### गरज असेल तरच घराबाहेर पडा

**पुणे (आरंभ पर्व) : महाराष्ट्रात पुन्हा एकदा पावसाचा जोर वाढला आहे, पावसामुळे राज्यात प्रचंड नुकसान झालं आहे. याचा मोठा फटका हा मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्रात बसला आहे. विदर्भातही शेतकऱ्यांचं मोठं नुकसान झालं आहे. महाराष्ट्रात सुरू असलेल्या अतिमुसळधार पावसामुळे अनेक जिल्ह्यांमध्ये पुराचं संकट निर्माण झालं आहे. अनेक गावांना पुराचा वेढा पडल्यानं संपर्क तुटला आहे, काही ठिकाणी पुराच्या पाण्यात लोक अडकल्याचं पहायला देखील मिळत आहे. तर काही ठिकाणी पूल पाण्याखाली गेल्यानं वाहतूक देखील ठप्प झाली आहे. राज्यात पावसाचा जोर कायम राहणार असल्याचा इशारा हवामान विभागाकडून देण्यात आला आहे.**

# चिंचवडमध्ये भाऊजीची अत्यंत क्रूरपणे हत्या

## *कोयत्याने केले सपासप वार : चिंचवडमध्ये घडली घटना*



**"चिंचवडमध्ये पूर्ववैमनस्यातून वैभव थोरात याची मेहुण्याने काही जणांसोबत घेऊन हत्या केली. घटनेनंतर आरोपींना काही तासात अटक करण्यात आली आहे. ही घटना साडेतीनच्या सुमारास घडली." – अंकुश बांगर, वरिष्ठ पोलीस निरीक्षक**

**पिंपरी- चिंचवड (दै. आरंभ पर्व)**


सतत होणारे वाद आणि बहिणीला माहेरी येऊ न देणाऱ्या भाऊजीची अत्यंत क्रूरपणे कोयत्याने सपासप वार करून हत्या केल्याची घटना चिंचवडमध्ये घडली आहे. वैभव भागवत थोरात असे हत्या झालेल्या तरुणाचे नाव आहे. याप्रकरणी योगेश अनंत गायकवाड (मेहुणा), अनिल आनंद बनसोडे, महेश आप्पालाल कोळीसह सोळा वर्षीय अल्पवयीन मुलाला ताब्यात घेण्यात आलं आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी योगेश अनंत गायकवाडची बहीण हत्या झालेला वैभव भागवत थोरातची पत्नी आहे. आरोपी योगेशसह इतर आरोपींसोबत अनेकदा वैभवचे वाद झाले होते. याचा राग आरोपींच्या मनात होता. तसेच योगेशच्या बहिणीला वैभव माहेरी येऊ देत नव्हता. हा देखील राग योगेशच्या मनात होता.

आज दुपारी वैभव थोरात नागसेन झोपडपट्टी येथील पत्राशेडमध्ये काही जणांसोबत बसला होता. तेव्हा यातील आरोपींनी अचानक येऊन त्याच्यावर हल्ला केला. अत्यंत क्रूरपणे दोन्ही हातावर, छातीवर, डोक्यात कोयत्याने सपासप वार करण्यात आले. यात गंभीर जखमी होऊन वैभवचा जागीच मृत्यू झाला.

वैभव रक्ताच्या थारोळ्यात पडला होता. कोयत्याने अत्यंत क्रूरपणे वार करण्यात आले. वैभवचा उजवा हात कोपऱ्यापासून वेगळा झाला आहे. डाव्या हातावरही अनेक वार करण्यात आलेत. घटनेनंतर तात्काळ चिंचवड पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. तपासाची चक्रे फिरवली आणि अवघ्या काही तासात आरोपींना अटक करण्यात आली.

# पिंपरीतील रावण टोळीच्या सदस्यांना बेड्या; चार पिस्तुले जप्त



**पिंपरी- चिंचवड (दै. आरंभ पर्व)**

गुंडाविरोधी पथकाने रावण टोळीतील सराईत गुन्हेगारांना अटक केली आहे. आरोपींकडून चार पिस्तुले, तीन जिवंत काडतुसे आणि एक वापरलेल काडतुस पोलिसांनी जप्त केले आहे. अनिकेत अशोक बाराथे, अश्विन सुधीर गायकवाड, यशपाल सिंग अरविंद सिंग देवडा अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नाव आहेत. दोन अल्पवयीन मुलांना ताब्यात घेतलं आहे.

चिखली येथील पाटील नगरमध्ये ज्वेलर्सच्या दुकानावर दरोडा टाकण्याच्या तयारीत असलेल्या रावण टोळीतील सराईत गुन्हेगारांच्या मुसक्या गुंडाविरोधी पथकाने नुकत्याच आवळल्या. पैकी एकाकडे एक पिस्तुल आढळले होते. त्याचा तपास सहाय्यक पोलीस आयुक्त विशाल हिरे यांच्या मार्गदर्शनाखाली गुंडाविरोधी पथकाचे सहाय्यक पोलीस निरीक्षक हरीश माने यांचे पथक करत होते. अखेर आरोपींना सांगवी पोलीस ठाण्याच्या हद्दीतून अटक करण्यात आली.

# महापालिका आयुक्त नवल किशोर राम सत्ताधाऱ्यांना 'सरेंडर'?

## विभाग प्रमुखांच्या बदल्यात मोठ्या प्रमाणावर हस्तक्षेपांचा संशय

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी शनिवारी संध्याकाळी उशिरा प्रशासनात मोठे बदल केले आहेत. हे बदल करत असताना सामान्य प्रशासन विभाग आणि निवडणुक विभागाचे प्रमुख प्रसाद काटकर यांच्यासाठी थेट आयुक्तांचे ओएसडी म्हणून पोस्ट निर्माण केली आहे. तर घनकचरा विभागाचे प्रमुख संदीप कदम यांच्याकडे याच विभागाची धुरा कायम ठेवतानाच अतिक्रमण आणि मिळकत कर विभागातील गैरकारभारामुळे दंडीत झालेले उपायुक्त माधव जगताप यांच्याकडे आकाशचिन्ह विभागासारखे मलईदार खाते व अन्य विभागाच्या जबाबदाऱ्या सोपवत आपणही सिस्टिमच्या बाहेर नाही, हे अधोरेखित केले आहे. केंद्र शासनाच्या विविध महत्वाच्या विभागात प्रतिनियुक्तीवर काम केल्यानंतर महापालिका आयुक्तपदाची सूत्रे स्वीकारलेले आयुक्त नवल किशोर राम यांनी अल्पावधीतच कामाचा झपाटा दाखविला. शहर स्वच्छता, प्रशासकीय कामकाजातील सुधारणा व प्रकल्पांना गती देण्याचे निर्णय घेतानाच भल्या पहाटे व अचानक झोपडपट्ट्या व कचरा प्रकल्पांनाही भेटी देउन सुधारणांसाठी तातडीने निर्णय घेण्याच्या कार्यपद्धतीमुळे राम यांच्याकडून निश्चितच अपेक्षा उंचावल्या. प्रशासक राजवट असल्याने राम यांनी घेतलेले निर्णय चर्चेतही राहीले.



परंतू महापालिकेच्या निवडणुकीचे पडघम वाजू लागले, तसे राम यांच्या सारखा सज्जन अधिकारी देखिल यंत्रणेचा शिकार झाला की काय?अशी शंका त्यांच्या अलिकडच्या निर्णयांवरून दिसून येउ लागली आहे.



# स्वदेशीचा नारा



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज घटस्थापनेच्या मुहूर्तावर भारतीय लोकांना स्वदेशीचा नारा दिला. जीएसटी २.०ची घोषणा करताना हा स्वदेशीचा नारा दिला. याला फार मोठा अर्थ आहे. स्वदेशीचा नारा हा नुसता नारा नाही तर भारताला २०४७ पर्यंत विकसित राष्ट्र म्हणून उभे करण्याच्या मोदींच्या योजनेची ही सुरुवात आहे. स्वदेशी चळवळ सुरू झाली ती बंगाल फाळणीचा निर्णय रद्द करण्याच्या मागणीवरून. तिचा उद्देश ब्रिटिश वस्तूंवर बहिष्कार टाकून स्वदेशी उद्योगांना प्रोत्साहन देणे हा होता. पण आज त्याचे महत्त्व यानिमित्ताने पटत आहे. कारण अमेरिकन अध्यक्ष ट्रम्प यांनी भारतासह ब्राझील आणि कैक देशांवर टॅरिफ लावण्याचा आत्मघातकी निर्णय घेतला आहे. पण राष्ट्रवादाची भावना वाढवण्यासाठी त्यावेळी म्हणजे स्वातंत्र्य मिळवण्याआधी स्वदेशी चळवळीचा उपयोग झाला असला तरीही नंतर मात्र आर्थिक उदारीकरणामुळे भारताचे वाढते महत्त्व आणि भारताचे महत्त्व कमी करण्यासाठी ट्रम्प यांनी हा निर्णय घेतल्याचे बोलले जाते. त्याला शह म्हणून मोदी यांनी स्वदेशीचा नारा दिला. स्वदेशी चळवळीच्या महत्त्वातच आत्मनिर्भर भारत निर्माण करण्याचे मोदी यांचे आणखी एक उद्दिष्ट साध्य करण्याची आकांक्षा दडली आहे आणि त्यामुळे अशा उपक्रमांना प्रेरणा मिळते. खरे तर स्वदेशीचे महत्त्व तेव्हाही होते. गांधी यांनी स्वदेशी चळवळ सुरू केली आणि तेव्हा स्वदेशीचे महत्त्व लोकांना पटू लागले. पण नंतरच्या काँग्रेस नेत्यांनी या स्वदेशी चळवळीला तिलांजली दिली आणि जरी खादी ग्रामोद्योगसारखे उपक्रम सुरू केले असले तरीही काँग्रेसचे नेते आलिशान पोषाखात आणि परदेशी वस्तूंचा वापर करत राहिले. त्यांचा प्रभाव आपण पाहात राहिलो आणि त्यांनाच मते देत राहिलो. पण मोदी यांनी आता काँग्रेसला चांगलेच उत्तर दिले आहे आणि काँग्रेस देशातून भुईसपाट झाली. पण काँग्रेसचे जे चांगले विचार होते ते मोदी यांनी स्वीकारले.

स्वदेशी चळवळ ही ब्रिटिश धोरणांना विरोध म्हणून सुरू झाली, तर आताची स्वदेशी चळवळ ही ट्रम्प यांच्या धोरणांना उत्तर म्हणून सुरू करण्यात येत आहे. पण मोदी यांचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे ते केवळ स्वदेशी चळवळ इतक्यावरच थांबले नाहीत, तर भारताला आत्मनिर्भर बनवण्याच्या मूलमंत्राला त्यांनी स्थान दिले आणि 'वन नेशन वन टॅक्स' हा मूलमंत्र लागू केला. त्यामुळे आता जीएसटी म्हणजे वस्तू आणि सेवा कराचे दोन टप्पे लागू असतील. त्यानुसार केवळ पाच टक्के आणि १८ टक्के असे दोनच कर स्लॅब असतील. यामुळे कर प्रणालीत सुसूत्रता येईल आणि लोकांनाही नवीन कर प्रणाली सहज समजेल. वन नेशन वन टॅक्स यामुळे देश डझनभर करांच्या जाळ्यातून मुक्त झाला. मोदी सरकारचे ब्रीद 'नागरिक देवो भव:' असे आहे आणि त्यातूनच मोदी सरकार नवनव्या सुधारणा पुढे आणत आहे, असे म्हणता येईल. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या जीएसटी करातील सुधारणा या देशाच्या अर्थसंकल्पाला नवे गतिमान देणाऱ्या ठरतील यात काही शंका नाही. अंदाजे अडीच लाख कोटी रुपयांची वार्षिक बचत या बदलांमुळे थेट ग्राहकांच्या खिशात पडणार असून हा पैसा पुन्हा बाजारपेठेत वळेल असा अंदाज आहे. मागणीला त्यामुळे प्रोत्साहन मिळेल आणि अर्थव्यवस्थेचे गाडे चालू राहील अशी दुसरी सकारात्मक बाजू आहे. आता जीएसटीतील बदलांमुळे रोजच्या वापरातील औषधे, घरगुती वापराच्या वस्तू, विमा सेवा यावरील जीएसटी कमी होईल आणि लोकांची क्रयशक्ती वाढेल. महागाईवर अंकुश बसेल. असे चांगले सकारात्मक परिणाम मोदी यांच्या जीएसटी २.० योजनेमुळे भारतीय ग्राहकांना चांगले दिवस येतील. मध्यमवर्गीय कुटुंबाचा बजेटवर ताण पडतो तो महागाईमुळे. तो कमी झाल्यामुळे आपोआपच ग्राहकांची क्रयशक्ती वाढेल आणि ते अन्यत्र खर्च करू शकतील. म्हणजे दुसरा साधा अर्थ काय तर मागणी वाढल्यामुळे अर्थचक्राचे गाडे सुरू राहील. मोदी यांची स्वदेशीचा नारा हा अशा वेळेला आला आहे, की ज्यावेळी ट्रम्प यांच्यासारख्या भारतविरोधी नेत्यांनी भारतावर अवाच्या सव्वा टॅरिफ लागू केला आहे. त्याला मोदी यांनी दिलेले हे उत्तर आहे. कारण जनतेच्या हातात पैसा आला, की बाजारात तेजी येते आणि अर्थव्यवस्थेला गती येते. तेच आताही दिसणार आहे. यामुळे लहान-मोठ्या व्यवसायांना गती येईल आणि बाजारात चैतन्य येईल. यालाच गुणक परिणाम म्हणतात. सर्व स्तरांतून या निर्णयाचे स्वागत होत आहे यावरून हा निर्णय देशासाठी चांगला आहे हे मान्य करावे लागेल. कारण जीएसटी आता फक्त ५ टक्के आणि १८ टक्के राहील. याचा परिणाम व्यापारी वर्गावर जास्त होणार आहे, कारण त्यांच्यावर या निर्णयाचा सर्वात चांगला परिणाम होणार आहे.

अर्थात हे सर्व असले तरीही राजकारणापासून जीएसटी सुधारणाही सुटल्या नाहीत. काँग्रेसला भाजपचे काहीच चांगले दिसत नाही, त्यामुळे त्यांनी यावर टीका करणे क्रमप्राप्तच होते. पण ममता बॅनर्जी आणि बिहारमधील विरोधी नेते यावर टीका करत आहेत. कारण हा चांगला निर्णय मोदी यांचा आहे. ही श्रेयवादाची लढाई आहे. ममता यांनी आपल्या सरकारला याचे श्रेय जाते असे म्हटले आहे. पण त्यांनी असे म्हणणे हे श्रेयवादाच्या लढाईत त्यांचा पराभव दिसत असल्यामुळे आहे हे खरेच आहे. जीएसटी ही संकल्पना प्रथम स्वर्गीय अरुण जेटली यांनी मांडली आणि तेव्हा पंतप्रधान नरेंद्र मोदीच होते. त्यामुळे यांचे श्रेय घेण्याचे प्रयत्न निव्वळ श्रेय लाटण्याचे आहे. पण आता जीएसटी सर्वमान्य झाली आहे आणि आता तर जीएसटी २.० ही आली आहे. मोदी यांचा हा निर्णय देशाच्या भल्यासाठी आहे आणि जनतेच्या अंतिम कल्याणासाठी आहे. कारण कोणताही निर्णय शेवटी जनतेच्या कल्याणासाठीच करायचा असतो. मोदी हे सर्व चांगले जाणतात आणि त्यामुळे त्यांनी हा निर्णय अमलात आणला आहे. फ्रान्सने सुरू केलेला ही संकल्पना आज सर्व जगाची ओळख बनली आहे आणि स्वदेशीच्या नाऱ्याची याला जोड देऊन मोदी यांनी मास्टर स्ट्रोक मारला, हे मान्य करायलाच हवे. कारण आर्थिक स्वातंत्र्याची गुरुकिल्ली आहे, मोदी यानी ते ओळखले आहे.

# नाम फाऊंडेशनला 'अतुल्य योगदान पुरस्कार २०२५' प्रदान

## यलो रिबन फेअरचा समारोप ग्रामीण परिवर्तनकर्त्यांचा गौरव करत



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

दीपक फर्टिलायझर्स अँड पेट्रोकेमिकल्स कॉर्पोरेशन लिमिटेड या कंपनीच्या सीएसआर अंगभूत विभाग असलेल्या इशान्या फाउंडेशनतर्फे आयोजित यलो रिबन एनजीओ व आर्टिजन फेअर – ग्रामीण भारत महोत्सव याचे १८ वे पर्व देशभरातील परिवर्तनकर्त्यांचा उत्सव साजरा करणाऱ्या भव्य समारोप सोहळ्याने संपन्न झाले.

या सोहळ्याचा विशेष आकर्षण होता 'अतुल्य योगदान पुरस्कार 2025' नाम फाउंडेशनला प्रदान करणे, ज्यांनी मराठवाडा आणि विदर्भातील दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांच्या जीवनमान उन्नतीसाठी केलेल्या सातत्यपूर्ण कार्याचा गौरव म्हणून हा सन्मान दिला गेला. रुपेरी स्मृतिचिन्ह व रु. २ लाखांचा धनादेश असा पुरस्कार डीएफपीसीएलचे चेअरमन व मॅनेजिंग डायरेक्टर श्री. शैलेश मेहता यांनी नाम फाउंडेशनच्या सल्लागार सौ. शुभांगी नायक, सीटीओ श्री. निखिल गंगवाणे आणि मुख्य लेखापाल श्री. संजीव गुड्डुम यांना सुपूर्द केला. या प्रसंगी अभिनेत्री सौ. पूनम ढिल्लन यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

यावेळी श्री. मेहता म्हणाले, "अभिनेता, लेखक व दिग्दर्शक श्री. नाना पाटेकर यांच्या नेतृत्वाखालील नाम फाउंडेशनचा सन्मान करताना आम्हाला आनंद होत आहे. केवळ आर्थिक मदत नव्हे तर वृक्षलागवड (१ कोटी झाडे), शेतकरी प्रशिक्षण, शेती व रोजगार केंद्रे, गाव दत्तक यांसारख्या उपक्रमांमधून हा फाउंडेशन शाश्वत प्रभाव निर्माण करत आहे. यारएनएफच्या १८ वर्षांच्या प्रवासात आम्ही अनेक एनजीओ व कारागिरांची उत्पादने मोठ्या रिटेलर्सपर्यंत, कॉर्पोरेट गिफ्टिंग बास्केटपर्यंत आणि अगदी निर्यात बाजारांपर्यंत पोहोचताना पाहिली आहेत. उत्पादन मार्गदर्शन, पॅकेजिंग तसेच आवश्यक विपणन संधी उपलब्ध करून देत, हा उपक्रम समाजाच्या सर्वात खालच्या स्तरापर्यंत 'मेक इन इंडिया'ला बळकटी देत आहे."

इशान्या फाउंडेशनच्या मॅनेजिंग ट्रस्टी सौ. पारुल मेहता म्हणाल्या, "यलो रिबन एनजीओ व आर्टिजन फेअरने पुन्हा एकदा आपल्या ग्रामीण समाजातील समुदाय, कारागीर व एनजीओंची ताकद आणि सर्जनशीलता दाखवून दिली. या पाच दिवसांत आम्ही लढाऊ वृत्ती, शाश्वत उपक्रम आणि सामूहिक उद्यमशीलतेच्या प्रेरणादायी कथा अनुभवल्या. हा मंच केवळ भारताच्या सांस्कृतिक वैविध्याचा उत्सव साजरा करत नाही तर गावे-पातळीवरील परिवर्तनकर्त्यांना संधी दिल्यास सर्वसमावेशक प्रगती शक्य आहे हे अधोरेखित करतो."

तसेच, ग्रामीण भारत महोत्सव पुरस्कार – नाबार्डच्या सहकार्याने स्थापन – हरियाणातील 'विरासत बॅक 2 रूट्स हँडीक्राफ्ट प्रोड्युसर को. लि.' या संस्थेला YRNF मधील सर्वोत्तम स्टॉल म्हणून प्रदान करण्यात आला.

## स्टॉल स्पर्धेतही विविध संस्थांचा सन्मान

- **स्वदेश फाउंडेशन, महाराष्ट्र – प्रथम पारितोषिक**
- **अ हंड्रेड हँड्स, कर्नाटक – द्वितीय पारितोषिक**
- **ट्रायबल तुमा आणि बांबू क्राफ्ट – तृतीय पारितोषिक**
- **प्रियांका टेमगिरे – सर्वोत्तम फूड स्टॉल**

ही पारितोषिके अभिनेत्री सौ. पूनम ढिल्लन, सौ. पारुल मेहता (मॅनेजिंग ट्रस्टी, इशान्या फाउंडेशन) व सौ. रश्मी दराड (सीजीएम, नाबार्ड) यांच्या हस्ते प्रदान करण्यात आली.

पाच दिवस चाललेल्या या मेळाव्यात देशातील २० हून अधिक राज्यांतील कारागीर, विणकर, शेतकरी व सामाजिक उद्योग एकत्र आले होते. ३,००० पेक्षा अधिक हस्तनिर्मित व पर्यावरणपूरक उत्पादने येथे प्रदर्शित करण्यात आली. याशिवाय, इशान्या फाउंडेशनतर्फे डिजिटल मार्केटिंगचे प्रशिक्षण यासह क्षमतावृद्धी कार्यशाळा आयोजीत करण्यात आल्या ज्यामुळे सहभागी संस्थांना शाश्वत वाढीसाठी आवश्यक साधने उपलब्ध झाली.

यलो रिबन एनजीओ व आर्टिजन फेअर यशस्वी समारोपाने केवळ उदरनिर्वाह सबलीकरणाचा, शाश्वततेचा आणि सामाजिक परिणामाचा दीपस्तंभ ठरला असून इशान्या फाउंडेशनच्या सर्वसमावेशक विकासाच्या ध्येयाशी सुसंगत ठरत आहे.

# 'H&M'S कडून ग्लॅमरस आणि रेडी-टू-विअर फेस्टिव्ह कलेक्शन

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

जागतिक फॅशन ब्रँड H&M'S ने सणासुदीच्या पार्श्वभूमीवर पुरुष, स्त्रिया आणि मुलांसाठी खास फेस्टिव्ह कलेक्शन सादर केले आहे. या कॅप्सूल कलेक्शनमध्ये महिलांसाठी धाडसी आणि लक्षवेधी डिझाईन्स असून, आधुनिकतेसह सणाचा उत्साह अनुभवण्यावर भर देण्यात आला आहे. या कलेक्शनचा पहिला भाग २५ सप्टेंबरपासून H&M'S चे पुण्यातील लेकशोअर कोपा मॉल, फिनिक्स मार्केटसिटी, अमनोर मॉल, वेस्टएंड मॉल, फिनिक्स मॉल ऑफ द मिलेनियम यांसारख्या स्टोअर्समध्ये तसेच hm.com आणि Myntra वर उपलब्ध होणार आहे. दुसरा भाग ९ ऑक्टोबरपासून बाजारात येणार आहे. H&M'S च्या कॉन्सेप्ट डिझायनर एलियाना मॅसगालोस यांनी सांगितले की, "दिवाळीसारख्या खास पर्वासाठी ग्लॅमरस कलेक्शन सादर करण्याचा आम्हाला आनंद आहे. ग्राहकांना आत्मविश्वासाने आणि स्टाईलिश पद्धतीने सण साजरा करता यावा, हा यामागचा उद्देश आहे."

# नृत्यांगणांचा नाच; आयोजक व डीजेचालकावर गुन्हा दाखल

**किरण खुडे**




**राजगुरूनगर (दै. आरंभ पर्व)**

बैलपोळ्याला बैलांच्या मिरवणूकीत डीजेच्या तालावर नृत्यांगणांचा नाचायचा कार्यक्रम ठेवणे महागात पडले असून याप्रकरणी आयोजक व डीजेचालकावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. खेड तालुक्याच्या पश्चिम भागातील वाडा गावात बैलपोळा सणानिमित्त आयोजित मिरवणूकीत नृत्यांगनांसह ऑर्केस्ट्रा कार्यक्रमामुळे पुणे ग्रामीण जिल्हाधिकाऱ्यांच्या प्रतिबंधात्मक आदेशाचा भंग झाल्याप्रकरणी खेड पोलीस ठाण्यात सहा जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या प्रकरणी महाराष्ट्र पोलीस कायदा १९५१ च्या कलम ३७(१), (३)/१३५, ३६/१३४ आणि कलम २२३ अंतर्गत आयोजक व डीजे चालकावर कारवाई करण्यात आली. पुणे ग्रामीण जिल्हाधिकाऱ्यांनी दि. १९ सप्टेंबरपासून २ ऑक्टोबरपर्यंत प्रतिबंधात्मक आदेश जारी केला आहे. या आदेशानुसार, कोणत्याही सार्वजनिक मिरवणुकीसाठी किंवा कार्यक्रमांसाठी परवानगी घेणे बंधनकारक होते. तरीही कोणतीही पुर्वपरवानगी न घेता वाडा गावातील दत्त मंदिरापासून ग्रामपंचायत कार्यालयापर्यंत रविवारी (दि. २१) सकाळी अकराच्या सुमारास वाडा येथील धर्मराज बैलगाडा संघटना आणि दहशत किंग गुज्जर बैलगाडा संघटना यांनी बैलपोळा मिरवणूक काढली आणि मिरवणूकीत ऑर्केस्ट्रा कार्यक्रम आयोजित केला. यामध्ये लाल रंगाच्या ट्रॅक्टर ट्रॉलीवर लाकडी स्टेज बनवून ऑर्केस्ट्राचा कार्यक्रम सादर करण्यात आला.

# "सुपर फोरमध्ये सुपर विजय" : 'डॉ. अनिल पावशेकर'




**पुणे (दै. आरंभ पर्व)**

आशिया चषकाच्या सुपर फोर फेरीतील दुसऱ्या सामन्यात भारताने पाकचा सहा गडी राखून दणदणीत पराभव केला आहे. साखळी फेरी पाठोपाठ पाकला पुन्हा दणका देत भारताने पाकवर हुकूमत गाजवली आहे. अभिषेक शर्मा आणि शुभमन गील जोडीने पाक गोलंदाजांच्या चिंधड्या उडवत सामना पुन्हा एकदा एकतर्फी केला. पूर्वार्धात आपल्या गचाळ क्षेत्ररक्षण आणि बेरंग गोलंदाजीने पाकला चांगलाच अॅडव्हांटेज मिळाला होता परंतु उत्तरार्धात भारतीय फलंदाजांनी धाडसी फलंदाजी करत पाकला चारी मुंड्या चीत केले.

झाले काय तर सूर्याचा नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजीचा निर्णय योग्यच होता आणि पांड्याने झकास सुरुवात पण केली होती. मात्र पहिल्या सामन्यानंतर सूर्याने जी नो शेकहॅन्ड्स पॉलीसी खेळली होती ती या सामन्यात सुद्धा दिसून आली. मात्र यावेळी शेकहॅन्ड्स पाक खेळाडूंसोबत नव्हते तर ते उडलेल्या झेलांसोबत होते. अभिषेक ने दोन तर कुलदीपने एक झेल सोडून प्रारंभी जो दबाव पाकवर निर्माण करता आला असता, तो गमावला. भलेही आक्रमक फखर झमन लवकर बाद झाला परंतु जीवदान मिळाल्याने पाक फलंदाजांचा आत्मविश्वास वाढला आणि त्यांनी बुमराह अँड कंपनीला ठोकून काढले.

पाकने मागील सामन्यातील चुकांचा बोध घेत यावेळी वेगळी रणनिती आखली होती. अनुभवी फखर झमनला सलामीला धाडले आणि त्यांनी यावेळी बुमराहला लक्ष्य केले होते. कारण मुळावर घाव घातला की फांद्या आपोआप खाली येतात हे त्यांना चांगले माहीत होते. बुमराहचा बेरंग होताच पाकने दहा षटकांत नव्वदी ओलांडून चांगली सुरुवात केली होती. अखेर नियमित गोलंदाजांना पाक फलंदाज भीक घालत नाही हे लक्षात येताच सूर्याने पार्ट टाईम शिवम दुबेला आक्रमणाला लावले आणि दुबेने पाक संघाची नांव कशी डुबेल याची काळजी घेतली.

अकराव्या षटकात सईम अयुब बाद होताच पाकची बुलेट ट्रेन चक्क पॅसेंजर गाडी झाली. अकरा ते सतराव्या षटकापर्यंत दुबेसहीत फिरकीपटूंनी अचूक मारा करत पाक फलंदाजांना वेसण घातले. मात्र डावाच्या अखेरीस पाक फलंदाजांनी फटकेबाजी करत धावसंख्या १७१ पोहचवली. अर्थातच ही धावसंख्या नक्कीच चांगली होती आणि यावेळी पाक संघात वेगवान गोलंदाज हॅरिस रौफचा समावेश झाल्याने ही लढत मध्यंतरापर्यंत फिप्टी फिप्टी अशी होती. उत्तरार्धात पाक गोलंदाज आणि भारतीय फलंदाजांतील जुगलबंदी रंगणार अशी चिन्हे दिसत होती.

मात्र अभिषेक आणि शुभमन जोडीचा इरादा काही वेगळा होता. शाहीन आफ्रिदीच्या पहिल्याच चेंडूंवर षटकार ठोकत अभिषेकने झिरो टॉलरन्स, नो मर्सी पॉलिसी दाखवून दिली. दोघांनीही पाक गोलंदाजांना उठता लाथ बसता बुक्की करत चोपून काढले. त्याने सहा चौकार आणि पाच षटकारांसह उंच उंच लढत दिली तर शुभमनने खणखणीत आठ चौकार ठोकत पाकचा इंच इंचाचा हिशोब चुकता केला. या दोघांच्या झंजावाताने पाक गोलंदाजीचा पालापाचोळा झाला आणि दहा षटकाच्या आतच भारताने शंभरी गाठली.

खरेतर यानंतर सामन्यातली चुरस निघून गेली होती . भलेही शुभमन, सूर्या, अभिषेक आणि संजू सॅमसन उर्वरित धावा काढतांना बाद झाले परंतु पाकला सामन्यात परतता आले नाही. पाकतर्फे हॅरिस रौफने थोडीफार जिद्द आणि अॅग्रेशन दाखवले परंतु बाकी गोलंदाज म्हणजे चिनी कम होते. जसा आपल्या कडे बुमराह प्रभाव पाडू शकला नाही, तसेच त्यांचा हुकमी गोलंदाज शाहीन आफ्रिदी निष्प्रभ ठरला. तर सईम अयुब, अब्रार आणि अश्रफ हे गोलंदाज अभिषेक शुभमनला शरण गेले.

पाक संघाचे काय चुकले तर त्यांनी फलंदाजीत चांगली सुरुवात करूनही त्याचे मातेरे केले. विशेषतः भारतीय क्षेत्ररक्षकांनी चार झेल आणि एक धावबाद ची लयलूट करूनही ते १७१ पर्यंत थबकले. शिवाय त्यांनी ४२% डॉट बॉल खेळल्याने स्वतःवर दबाव निर्माण करून घेतला. तर आपले दोन तीन गडी बाद होताच आक्रमक क्षेत्ररक्षण लावून एकेरी धावबंदी करून फलंदाजांची कोंडी निर्माण करता आली असती. तसेच सईम अयुब ऐवजी हॅरिस रौफला लवकर गोलंदाजीला लावले असते तर काही अंशी त्याचा फायदा झाला असता.

आपल्या संघाबाबत बोलायचे झाले तर क्षेत्ररक्षण सुमार होते आणि पहिल्या दहा षटकात पाक फलंदाजांना आपले गोलंदाज काबूत ठेवू शकले नाहीत. तर फिरकीपटू दबाव निर्माण करत असताना अक्षरला केवळ एक षटक दिले गेले. फलंदाजीत अभिषेक शुभमनने धडाकेबाज फलंदाजी केली पण सूर्या, सॅमसन फारशी चमक दाखवू शकले नाहीत. मात्र तिलक वर्माने एक बाजू लावून धरत पाकवर सुपर फेरीत सुपर विजयाची औपचारिकता पूर्ण केली.

## थोडक्यात पण महत्वाचे



### कै. नारायणराव नवले प्राथमिक शाळेला युनायटेड वे दिल्ली प्रकल्पांतर्गत गौरव!

**पुणे (आरंभ पर्व) : कै नारायणराव नवले प्राथमिक शाळेत आनंदाची लहर पसरली. युनायटेड वे, दिल्ली, निव प्रकल्पांतर्गत शाळेला सन्मान चिन्ह प्रदान करण्यात आले. या प्रसंगी बालवाडी शिक्षिका व सेविकांना प्रमाणपत्र देऊन त्यांचा गौरव करण्यात आला. समारंभात निव प्रकल्पाचे अरुणा विचारे मॅडम आणि राकेश उने प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. शाळेतील प्रभारी मुख्याध्यापिका सुमन गंथडे मॅडम, स्वाती पडवळ मॅडम, गणेश पतंगे सर, वैभव फटांगरे सर, तसेच बालवाडी शिक्षिका सोनाली महाडिक, अंजू ढवळे, सुवर्णा इनामदार आणि सेविका सुरेखा जाधव, सुनिता पानसे, सविता लोखंडे यांच्यासह संपूर्ण शिक्षक वर्ग उपस्थित होता. कार्यक्रमात उपस्थित सर्वांनी बालवाडी शिक्षिका व सेविकांच्या मेहनतीचे कौतुक केले आणि शाळेच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. शाळेतील वातावरण उत्साहाने भरले होते, हसरे चेहरे आणि आनंदाने भरलेला उत्सव या गोष्टींमुळे उपस्थितांचे मन मोहून गेले.**



### आयटीमध्ये धोका नाही; नवे तंत्रज्ञान आत्मसात करावे – धोंडीराम कुंभार

**पुणे (आरंभ पर्व) : "आयटी क्षेत्रामध्ये कोणताही धोका नाही. आजच्या काळात विद्यार्थ्यांनी घाबरण्याची गरज नसून त्यांनी नवीन-नवीन तंत्रज्ञान आत्मसात केले पाहिजे. मार्केटमध्ये नोकऱ्या उपलब्ध आहेत. फक्त अद्ययावत कौशल्ये अंगीकारणे गरजेचे आहे," असे मत आयटी क्षेत्रातील तज्ज्ञ अभियंता धोंडीराम कुंभार यांनी व्यक्त केले. दै. 'आरंभ पर्व'चे पत्रकार महेश वरवटे यांच्याशी झालेल्या खास मुलाखतीत बोलताना कुंभार म्हणाले की, "आर्टिफिशियल इंटेलिजन्स (AI), मशीन लर्निंग (ML) ही क्षेत्रे वेगाने वाढत आहेत. या क्षेत्रामध्ये करिअर करण्याची मोठी संधी विद्यार्थ्यांसमोर आहे. योग्य मार्गदर्शन आणि सातत्यपूर्ण शिक्षण घेतल्यास तरुणांना भविष्यकाळात उत्तम करिअर घडविता येईल." यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांना तंत्रज्ञानावरील भीती झटकून नावीन्यपूर्ण प्रगतीकडे पाऊल टाकण्याचे आवाहन केले.**



### पंतप्रधान यांच्या वाढदिवसानिमित्त स्वच्छता व वृक्षारोपण कार्यक्रम

**खडकवासला (आरंभ पर्व) : पंतप्रधान मा. नरेंद्रजी मोदी साहेब यांच्या वाढदिवसानिमित्त सेवा पंधरावाडा उपक्रमांतर्गत खडकवासला ग्रामीणच्या वतीने सिंहगड किल्ल्यावर स्वच्छता मोहीम व वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाचे मार्गदर्शन खडकवासला मतदारसंघाचे कार्यसम्राट आमदार मा. श्री. भिमराव (आण्णा) तापकीर यांनी केले. तर खडकवासला ग्रामीण अध्यक्ष श्री. नवनाथ (भाऊ) तागुंदे व भाजप पदाधिकारी यांच्या पुढाकाराने हा उपक्रम राबविण्यात आला. कार्यक्रमाला भाजप पुणे जिल्हा उपाध्यक्ष सचिन (भाऊ) पायगुडे, युवा मोर्चा अध्यक्ष शरद (लालाशेठ) जावळकर, भाजप नेते दिपक राजपूत, पुणे जिल्हा दिव्यांग आघाडी अध्यक्ष बाजीराव पारगे, ग्रामपंचायत सदस्य नवनाथ मोकर, राजू दिघे, शिवविख्याते सौ. रसिकाताई सणस, महिला मोर्चा अध्यक्ष सौ. संतोषी ताई दारवटकर, कृष्णा अवसरे, दत्ताभाऊ पायगुडे, राजू जरांडे, भाऊसाहेब अनारसे, किरण खिरीड, किरण तागुंदे, शिवाजी पवार, रोकडे भाऊ, मीडिया प्रमुख सुजल मोकाशी, राजू भामे आदी मान्यवर व कार्यकर्त्यांची उपस्थिती होती. यावेळी बोलताना खडकवासला ग्रामीण अध्यक्ष नवनाथ तागुंदे म्हणाले ,पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भारताच्या विकासासाठी परिश्रम घेतले आहे . त्यांच्या 75 व्या वाढदिवसानिमित्त खडकवासला भाजपाच्या वतीने स्वच्छता अभियानाचे आयोजन करण्यात आले. व सामाजिक भान जपत सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते हा कार्यक्रम संपन्न झाला.**






दैनिक आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com
मंगळवार, दि. २२ सप्टेंबर २०२५














# तक्रारीनंतरच महानगरपालिका ॲक्शन मोडवर

## ग्रामस्थांच्या दबावानंतर उचलला कचरा : बदलून गेलेल्या सहाय्यक आयुक्तांच्या हस्तक्षेपावर संशय




### एका अधिकाऱ्याची तत्परता तर दुसऱ्याची सारवासारव

**महानगरपालिका घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उप आयुक्त संदीप कदम यांनी स्वतः लक्ष घातल्यामुळे लोणीकंद मध्ये टाकलेला कचरा महानगरपालिकेच्या माध्यमातून उचलण्यात आला. परंतु दुसरीकडे यामध्ये सारवासारव करण्यासाठी नगर रोड क्षेत्रीय कार्यालयातून बदलून गेलेल्या व आता उपायुक्त पदावर कार्यरत असलेल्या एका अधिकाऱ्याने फोन केल्याने ग्रामस्थांमध्ये मोठी नाराजी आहे.**

**वाघोली (दै. आरंभ पर्व)**
लोणीकंद-केसनंद रोडवरील खंडोबा मंदिरामागे वाघोलीतील कचरा टाकल्याच्या प्रकरणाने परिसरात मोठी खळबळ उडवली होती. ग्रामपंचायत सदस्य आणि ग्रामस्थांनी याबाबत सातत्याने तक्रारी केल्यानंतर अखेर २० सप्टेंबर रोजी सायंकाळी साडेसहा वाजता पुणे महानगरपालिकेची यंत्रणा घटनास्थळी दाखल झाली. मात्र, ग्रामस्थांनी "ज्याने कचरा टाकला त्यानेच उचलावा" असा ठाम पवित्रा घेतल्याने महानगरपालिकेची गाडी जवळपास तीन तास ठप्प राहिली. शेवटी आरोग्य निरीक्षक सचिन लडकत यांनी संबंधित सोसायटीवर दंडात्मक कारवाई केली जाईल, असे आश्वासन दिल्यानंतर ग्रामस्थांनी माघार घेतली आणि कचरा उचलण्यात आला. या प्रकरणात ग्रामपंचायत सदस्य राहुल शिंदे, ओंकार कंद, विशाल ढमढरे, चेतन शिंदे, राजेंद्र कंद, प्रतीक कंद, ओंकार जमादार, गणेश कंद, केतन शिंदे, कुमार झुरुंगे, कुणाल कंद, अक्षय जमादार यांच्यासह मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते. ग्रामस्थांनी स्पष्ट इशारा दिला की, लोणीकंद हद्दीत पुन्हा कचरा टाकताना कुणी आढळल्यास त्या गाड्या थेट पोलिसांच्या ताब्यात दिल्या जातील. दरम्यान, घटनास्थळी महानगरपालिका गाड्या आल्यानंतर नगररोड विभागातील बदलून गेलेल्या एका सहाय्यक आयुक्तांचा आरोग्य निरीक्षकांना फोन आल्याने नवीन वाद निर्माण झाला आहे. संबंधित अधिकाऱ्यांनी या प्रकरणावर पडदा टाकण्याचा प्रयत्न करत केवळ नाममात्र दंड करण्याचे निर्देश दिल्याचे बोलले जात आहे. यामुळे प्रश्न उपस्थित होतो की, बदलून गेलेले अधिकारी कचऱ्यासारख्या प्रकरणात एवढा रस का घेत आहेत? त्यांच्या हितसंबंधांचा धागा कुठे आहे, असा संशय ग्रामस्थांनी व्यक्त केला आहे.

सदर कचऱ्यातून मिळालेल्या कागदपत्रांतून तो वाघोलीतील एका सोसायटीचा असल्याचे स्पष्ट झाले असून संबंधित सोसायटीवर लवकरच दंडात्मक कारवाई होणार असल्याची माहिती आरोग्य निरीक्षक सचिन लडकत यांनी दिली. तथापि, या सर्व घडामोडींमुळे वाघोली परिसरातील कचरा व्यवस्थापनामध्ये मोठ्या आर्थिक उलाढालीचे घोटाळे होत असल्याची चर्चा अधिकच रंगू लागली आहे.

एकूणच, ग्रामस्थांच्या दबावानंतरच महानगरपालिकेला कारवाई करावी लागली असून बदलून गेलेल्या सहाय्यक आयुक्तांच्या हस्तक्षेपावर आता प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे. या पार्श्वभूमीवर पुणे महानगरपालिका आयुक्त या प्रकरणाची चौकशी करणार का, हा प्रश्न नागरीकांमध्ये उपस्थित होत आहे.




## ग्लोबल एज्युकेशन फेअर २०२५ – २७ सप्टेंबरला; मोफत प्रवेश

**पुणे (दै. आरंभ पर्व)**
भारतातील अग्रगण्य परदेश शिक्षण सल्लागार संस्था स्टडी स्मार्ट तर्फे 'ग्लोबल एज्युकेशन फेअर २०२५' शनिवार, २७ सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी ११.०० ते सायं. ५.०० या वेळेत पोचा हॉल, बोट क्लब, पुणे येथे आयोजित करण्यात येत आहे. विद्यार्थ्यांना परदेशात उच्च शिक्षण घेण्यासाठी हा कार्यक्रम एकाच छताखाली संपूर्ण मार्गदर्शन देणारा ठरणार असून प्रवेश विद्यार्थ्यांसाठी आणि पालकांसाठी मोफत आहे.

पुणे श्रमिक पत्रकार भवन येथे आयोजित पत्रकार परिषदेत स्टडी स्मार्टचे व्यवस्थापकीय संचालक चेतन जैन म्हणाले की, बारावी किंवा पदवी पूर्ण केल्यानंतर हजारो विद्यार्थी परदेशात शिक्षण घेण्याचे स्वप्न बाळगतात; मात्र योग्य विद्यापीठाची निवड, प्रवेशप्रक्रिया, शिष्यवृत्ती, आर्थिक नियोजन आणि राहण्याची सोय याबाबत अनेकांना संभ्रम असतो. ग्लोबल एज्युकेशन फेअर या सर्व प्रश्नांवर तोडगा काढण्यासाठी विशेष रचण्यात आला आहे. यात विद्यार्थ्यांना यूके, यूएसए, आयर्लंड, जर्मनी, दुबईसह विविध देशांतील ६० हून अधिक नामांकित विद्यापीठांच्या प्रतिनिधींशी थेट संवाद साधता येणार आहे.

या फेअरमध्ये शिष्यवृत्ती, आर्थिक मदत योजना, जानेवारी व सप्टेंबर २०२६ प्रवेश संधी, स्पॉट ऑफर्स, IELTS वेव्हर्स, तसेच परदेशात शिक्षणानंतर उपलब्ध होणाऱ्या नोकरीच्या संधींबाबत मार्गदर्शन करणाऱ्या इंटरॅक्टिव्ह वर्कशॉप्स आयोजित करण्यात येणार आहेत.


## थोडक्यात पण महत्वाचे



### पत्रकारांवर झालेल्या भ्याड हल्ल्याच्या निषेधार्थ निवेदन

पुणे (आरंभ पर्व) : हवेली तालुका मराठी पत्रकार संघ यांच्या वतीने आज नाशिक जिल्ह्यातील त्र्यंबकेश्वर या ठिकाणी पत्रकारांवर झालेल्या भ्याड हल्ल्याच्या निषेधार्थ लोणी काळभोरचे पोलीस निरीक्षक राजेंद्र पन्हाळे यांना निवेदन देऊन पत्रकारावर झालेल्या भ्याड हल्ल्याचा निषेध व्यक्त केला. हे निवेदन लोणी काळभोरच्या गुन्हे शाखेच्या पोलीस निरीक्षक स्मिता पाटील यांनी स्वीकारले. यावेळी सहाय्यक पोलीस निरीक्षक कृष्णा बाबर, पोलीस हवालदार मंगेश नानापुरे उपस्थित होते आणि ज्या गाव गुंडांनी पत्रकारांवर हल्ला केला त्यांच्यावर कठोरात कठोर कारवाई करण्याची मागणी केली.समाजातील पीडित व अन्यायग्रस्तांच्या प्रश्नांना वाचा फोडण्याचे काम पत्रकार करतो लोकशाहीचा चौथा आधारस्तंभ म्हणून पत्रकारितेकडे पाहिले जाते अशाच पत्रकारांना गाव गुंडांकडून मारहाण केली जाते ही निषेधार्थ बाब आहे त्यामुळे अशा प्रवृत्ती बोकाळू नये म्हणून त्यांवर वेळीच कार्यवाही होणे आवश्यक असल्याचे मत हवेली तालुका मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष पंढरीनाथ नामुगडे यांनी यावेळी व्यक्त केले. यावेळी राज्य सरचिटणीस सिताराम लांडगे यांनी हल्लेखोरांवर पत्रकार संरक्षण कायद्या अंतर्गत कारवाई करण्याची मागणी केली. हवेली तालुका कार्याध्यक्ष तुषार काळभोर सचिव विजय रणदिवे उपाध्यक्ष गणेश धुमाळ संघटक दिगंबर जोगदंड प्रसिद्धीप्रमुख दीपक गिरी सरचिटणीस ज्ञानेश्वर शिंदे कार्यकारणी सदस्य अमन शेख सहदेव खंडागळे सुवर्णा कांचन तुषार खोले, आदी सदस्य उपस्थित होते.

### वॉल्वो कार इंडिया'ची नवीन बीईव्ही दाखल; इलेक्ट्रिक वॉल्वो ईएक्स30




पुणे (आरंभ पर्व) : वॉल्वो कार इंडिया (Volvo Car India)च्या वतीने नवीन इलेक्ट्रिक कार EX30 सादर करण्यात आली. पुणे येथील इच्छुक खरेदीदार वॉल्वो कार्स- फ्लायगा ऑटो पुणे शोरूम येथे चाचणी ड्राइव्ह घेऊ शकतात आणि डिलिव्हरीच्या वेळी विशेष सवलती मिळवण्यासाठी कार पूर्व-आरक्षित करू शकतात. बहुप्रतिक्षित सर्वार्थाने इलेक्ट्रिक एसयूव्ही सप्टेंबरच्या अखेरीस किंमतीच्या तपशीलासह अधिकृतपणे लॉन्च करण्यात येईल. तसेच ग्राहकांना वाहन डिलिव्हरी नोव्हेंबर 2025 च्या सुरुवातीपासून सुरू होतील. कर्नाटकातील बंगळुरू येथील होसाकोटे येथील कंपनीच्या कारखान्यात EX30 चे उत्पादन केले जात आहे. EX30 ही वॉल्वोची सर्वात टिकाऊ कार असून ती आतापर्यंतच्या कोणत्याही पूर्णपणे इलेक्ट्रिक वॉल्वोपेक्षा सर्वात कमी कार्बन फूटप्रिंट असलेली आहे.

## पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त स्वच्छता अभियान

**पुणे (दै. आरंभ पर्व)**
देशाचे लोकप्रिय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या ७५ व्या जन्मदिनानिमित्त भारतीय जनता पक्षाच्या वतीने सेवा पंधरवड्याचे आयोजन करण्यात आले आहे. या उपक्रमांतर्गत धायरी फाटा येथील मानस सोसायटी परिसरात तसेच वडगाव बुद्रुक येथे स्वच्छता अभियान राबविण्यात आले.




आमदार भीमराव अण्णा तापकीर आणि माजी नगरसेवक बाळासाहेब नवले यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या उपक्रमाचे आयोजन भाजयुमोचे माजी अध्यक्ष सारंग नवले यांनी केले होते. कार्यक्रमाला भाजपा खडकवासला विधानसभा समन्वय बाळासाहेब नवले, मंडलाध्यक्ष यशवंत लायगुडे यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी व स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत परिसराची स्वच्छता केली आणि स्वच्छतेबाबत जनजागृती घडवून आणली. यावेळी बोलताना बाळासाहेब नवले म्हणाले की,

"पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या दूरदृष्टीमुळे आज भारत प्रगतीपथावर वाटचाल करत आहे. भविष्यात त्यांना दीर्घायुष्य लाभावे आणि देशासाठी उत्तम कार्य करण्याची संधी मिळावी," अशा शुभेच्छा त्यांनी व्यक्त केल्या. नागरिकांच्या स्वयंस्फूर्तीने झालेला हा उपक्रम उत्साहात आणि यशस्वीपणे पार पडला.






# लोणी काळभोर पोलीसांनी गांजासह ५ लाख रुपयांचा मुद्देमाल केला जप्त

## गांजा वाहुन नेणारी रिक्षा व गांजासह एकूण ५ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त



**अवैध धंद्यावरील या कारवायांमुळे लोणी काळभोर परिसरातील सर्व अवैध धंदे चालकांचे अवैध धंदे व अनाधिकृत कृत्यांना चाप बसविण्यात पोलीस प्रशासनास यश आले आहे. भविष्यात अशाच प्रकारच्या अत्यंत प्रभावी व दर्जेदार कारवाया करुन अवैध धंद्यांचे समूळ उच्चाटण करण्याचे उद्दीष्ठ असल्याची भावना वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र पन्हाळे यांनी याप्रसंगी व्यक्त केली आहे.**

**लोणी काळभोर (दै. आरंभ पर्व)**
दि. २१/०९/२०२५ रोजी दोन इसम उरुळी कांचन कडुन निगडीकडे जात असुन सदर रिक्षामध्ये मोठ्याप्रमाणात गांजा असल्याची गोपनीय माहिती पोलीस शिपाई राहुल कर्डीले यांना मिळाली .त्यांनी वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र पन्हाळे यांना सांगितली . वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र पन्हाळे यांनी सहा. पोलीस निरीक्षक कृष्णा बाबर यांचे एक स्वतंत्र पथक तयार करुन त्या पथकास सापळा रचुन कायदेशीर कारवाई करण्यासाठी सांगितले .त्यानुसार लोणी काळभोर पोलीस ठाण्यातील पोलीसांनी रिक्षा येणाऱ्या मार्गावर सापळा रचुन संशयीत रिक्षांवर पाळत ठेवली.

दि. २१/०९/२०२५ रोजी सकाळी ०९/१५ वाजण्याच्या सुमारास थेऊर रेल्वे पुला शेजारी असलेल्या सर्व्हिस रोडवर येथे संशयीत रिक्षा दिसताच लोणी काळभोर पोलीसांनी रिक्षा व रिक्षा चालकास ताब्यात घेतले. या रिक्षाची पोलीसांनी तपासणी केली असता रिक्षामध्ये रिक्षाचालक लक्ष्मण राजु पवार (वय ३० वर्षे, रा. यमुना नगर मनपा हॉस्पीटलच्या मागे, सिध्दार्थनगर झोपडपट्टी, ओटा स्किम निगडी, पुणे )याने त्याचा साथीदार रवि आण्णा कु-हाडे ( रा. यमुना नगर मनपा हॉस्पीटलच्या मागे, सिध्दार्थनगर झोरडपट्टी, ओटा स्किम निगडी, पुणे )याच्यासह सुमारे २,४०,०००/-रु किं. चा १२ किलो ३४५ ग्रॅम वजनाचा गांजा आढळून आला . हा गांजा ते त्यांचे ताब्यातील रिक्षा नं. एम एच १४ एल एस ३१४६ मधुन घेवुन जात असताना मिळुन आल्याने सदर रिक्षा देखील जप्त करण्यात आली आहे. असा एकुण सुमारे ५,००,०००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल लोणी काळभोर पोलीसांनी जप्त केला आहे. या बाबत लोणी काळभोर पोलीस ठाण्यात वरिल दोन इसम व एका अज्ञात इसमाविरुध्द गु. र. नं. ४२४/२०२५, एन.डी.पि.एस. अँक्ट ८ (क), २० (ब) (ii) (अ) प्रमाणे गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

लोणी काळभोर पोलीसांना या गुन्हयातील आरोपी तसेच रिक्षा नंबर अथवा इतर कोणतीही खात्रीशिर माहिती नसताना देखील, त्यांनी अतिशय कौशल्यपूर्णरित्या संशयीत रिक्षा व रिक्षा चालकास ताब्यात घेवुन त्याच्या कडुन सुमारे १२ किलो ३४५ ग्रॅम गांजा जप्त केला आहे.

ही उत्कृष्ठ कागगिरी पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ०५, डॉ. राजकुमार शिंदे, सहाय्यक पोलीस आयुक्त, हडपसर विभाग, श्रीमती अनुराधा उदमले यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र पन्हाळे, पोलीस निरीक्षक (गुन्हे) स्मिता पाटील, सहा. पोलीस निरीक्षक कृष्णा बाबर,पोलीस शिपाई राहुल कर्डीले यांनी केली आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे



## पुण्यात मोफत आरोग्य शिबिर व डोळ्यांच्या शस्त्रक्रिया यशस्वी

**● ओमकार दादा कदम यांचा सामाजिक उपक्रम**

पुणे (आरंभ पर्व) : भाजपा कामगार आघाडी पुणे शहर अध्यक्ष ओमकार दादा कदम यांच्या पुढाकाराने मोफत आरोग्य शिबिर तसेच डोळ्यांच्या मोफत शस्त्रक्रिया शिबिराचे यशस्वी आयोजन करण्यात आले. या उपक्रमाचा अनेक नागरिकांनी लाभ घेतला. दै. 'आरंभ पर्व'चे पत्रकार महेश वरवटे (लातूरकर) यांच्यासोबत संवाद साधताना कदम म्हणाले की, "दरवर्षीप्रमाणे यंदाही आम्ही हा उपक्रम राबवला असून, शेकडो नागरिकांनी आरोग्य तपासणी व मोफत शस्त्रक्रियेचा लाभ घेतला आहे. यासोबतच अनाथ, गरीब व गरजू मुलींच्या भविष्यासाठी २० मुलींना दत्तक घेण्याचा संकल्प यंदाही पूर्ण करण्यात येणार आहे." सामाजिक बांधिलकी जपत घेतलेला हा उपक्रम सर्व स्तरातून कौतुकास्पद ठरत असून, आरोग्य आणि शिक्षण या दोन महत्त्वाच्या गरजांसाठी दिलासा देणारा ठरत आहे.

## ध्यान केल्याने विचारांमागे लपलेली मनाची शांती प्रकट होते - सरश्री



पुणे (आरंभ पर्व) : जागतिक शांती दिनानिमित्त, तेजज्ञान फाउंडेशनचे संस्थापक आणि आध्यात्मिक गुरू सरश्री यांनी "आंतरिक जागतिक शांती" या विषयावर एक विशेष ध्यान सत्र आयोजित केले. सरश्री यांनी साधकांना अंतर्गत चिंता आणि अस्वस्थता दूर करून भावनिक संतुलन कसे मिळवायचे हे समजावून सांगितले. त्यांनी स्पष्ट केले की बालपणापासून मनात रुजलेल्या श्रद्धांचा खेळ एखाद्या व्यक्तीमध्ये चालू राहतो. तुमचे जीवन तुमच्या श्रद्धांवरून घडते. एखादी व्यक्ती आपले संपूर्ण आयुष्य "मी शरीर आहे" या खोट्या श्रद्धेत घालवते, ज्यामुळे तो शरीराच्या सुख-दुःखात, मनाच्या खेळात आणि बुद्धीच्या भ्रमात अडकतो. जेव्हा स्वतःची इतरांशी सतत तुलना करणारे मन ज्ञान मिळवते, तेव्हा अतिविचार कमी होतो आणि मनाची शांती स्थापित होते. त्यांनी पुढे म्हणाले की, सोडून देणे, क्षमा मागणे आणि स्वीकारणे, कृतज्ञता व्यक्त करणे आणि चेहऱ्यावर स्मित हास्य यासारख्या सजगतेचा सराव करून तुम्ही आंतरिक शांती मिळवू शकता. सरश्री म्हणाले की, दिवसातून काही मिनिटे ध्यान केल्याने विचारांमागे लपलेली मनःशांती प्रकट होते. त्यांनी उपस्थितांना ध्यानातही नेले. या प्रसंगी सरश्री यांनी लिहिलेल्या "आज के युग की दास्तान-ए-ययाति" आणि "सहस की बेटी - संतुलित जीवन सुंदर जीवन" या दोन हिंदी पुस्तकांचे प्रकाशनही करण्यात आले. तेजज्ञान फाउंडेशनच्या कार्यकारी विश्वस्त तेजविद्या यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. सिंहगड रोडवरील मनन आश्रमात हा कार्यक्रम झाला यावेळी हजारो साधक ऑफलाइन आणि ऑनलाइन माध्यमातून कार्यक्रमात सहभागी झाले होते.

# सोमय्या विद्याविहार विद्यापीठाने सुरू केला 'धर्म-अध्ययन' अभ्यासक्रम

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

सोमय्या विद्याविहार विद्यापीठाने 'धर्म-अध्ययन' हा एक महत्त्वपूर्ण अभ्यासक्रम सुरू केला आहे. भारताला बुद्धीमत्ता, ज्ञान आणि संस्कृती यांचा मोठा वारसा आहे. हा अभ्यासक्रम विद्यार्थ्यांना या वारशाशी जोडतो आणि त्यांना मूल्ये, संस्कृती आणि जागतिक समस्यांवर विचार करण्यासाठी सक्षम बनवतो.

आजच्या काळात जागतिक बदलांच्या संदर्भात अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. अशा परिस्थितीत या अभ्यासक्रमात धर्माच्या परंपरांचा सखोल अभ्यास करून विद्यार्थ्यांना न्याय, सामाजिक जबाबदारी आणि जागतिकीकरण या क्षेत्रांची ओळख करून दिली जाते. तसेच विद्यार्थ्यांना 'धर्म' फक्त भूतकाळातील संकल्पना नसून, तो आधुनिक काळात नैतिक मार्गदर्शन करणारा आणि समाजाला जोडणारी एक शक्ती आहे, याची जाणीव करून दिली जाते.




सोमय्या विद्याविहार विद्यापीठाच्या 'धर्म-अध्ययन' अभ्यासक्रमात संस्कृत, प्राकृत साहित्य, आधुनिक तत्त्वज्ञान, राजकीय सिद्धांत आणि सांस्कृतिक अभ्यास यांचा समावेश आहे. विद्यार्थ्यांना थेट प्राथमिक ग्रंथांद्वारे शिकण्याची संधी मिळते, ज्यामुळे त्यांची भाषा समृद्ध होऊन विश्लेषण क्षमता वाढते. त्याचबरोबर भारतीय ज्ञानपद्धतीचा आधार घेऊन मानवाधिकार, आंतरसांस्कृतिक संवाद यांचे महत्त्व समजावले जाते.

के. जे. सोमय्या धर्म-अध्ययन संस्थेच्या विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. अभिषेक घोष यांच्या मते, "धर्म हा फक्त भूतकाळाचा भाग नाही, तर आजच्या जगात नैतिक आणि सांस्कृतिक मार्गदर्शन देणारा महत्त्वाचा भाग आहे. आम्हाला विद्यार्थ्यांना परंपरेशी जोडून जागतिक संवादासाठी तयार करायचे आहे."

हा अभ्यासक्रम विद्यार्थ्यांना तत्त्वज्ञान, धर्मशास्त्र, सांस्कृतिक संशोधन यांमध्ये कुशल बनवतो आणि त्यांना आंतरराष्ट्रीय संस्था, विचारमंच आणि नैतिक नेतृत्व यामध्ये सहभागी होण्यासाठी सज्ज करतो. विद्यार्थ्यांना खालील क्षेत्रांमध्ये धर्म कसा संबंध ठेवतो हे शिकवले जाते:

***राजकारण आणि प्रशासन:*** *न्याय आणि जबाबदारीच्या धार्मिक तत्त्वांवर आधारित धोरणे तयार करणे*

***मानवाधिकार आणि जागतिक नैतिकता:*** *विविध संस्कृतींमध्ये समानता आणि अहिंसेचा अर्थ समजून घेणे*

***पर्यावरणाचे संगोपन - संतुलना*** *कडे लक्ष केंद्रित करुन आणि ते शाश्वत ठेवण्यासाठी धर्माच्या शिकवणींचा अभ्यास करणे.*

***तंत्रज्ञानाची नीतिमूल्ये:*** *एआय आणि डिजिटल (अंकीय) युगातील नैतिक प्रश्नांवर प्राचीन ज्ञानाचा उपयोग करणे*

'धर्म-अध्ययन' अभ्यासक्रमामुळे तयार होणारे विद्यार्थी केवळ संस्कृतीचे फक्त 'अभ्यासक' नसून, जागतिक बदलांचे नेतृत्व करणारे देखील असतील. हा अभ्यासक्रम भारतीय ज्ञानाचा एक भाग असून विद्यार्थ्यांना आजच्या काळातील आव्हानांशी सामना करण्यास सक्षम करतो.

सोमय्या विद्याविहार विद्यापीठाचा हा अभ्यासक्रम 'ज्ञान हाच खरा मुक्तिचा मार्ग आहे या तत्वावर आधारित आहे. विद्यार्थ्यांना सांस्कृतिक मुल्ये जपून जागतिक स्तरावर कार्य करण्यासाठी तयार करणे हा या अभ्यासक्रमाचा मुख्य उद्देश आहे.

## राष्ट्राच्या विकासामध्ये स्थापत्य अभियंत्याचे अनन्यसाधारण महत्व : डॉ. हेमंत धुमाळ

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

"राष्ट्राच्या विकासात स्थापत्य अभियंत्याचे महत्व अनन्यसाधारण असते. रस्ते, पूल, धरणे, कालवे, बंदरे, विमानतळे, गृहनिर्माण, शाळा-कॉलेजेस, रुग्णालयांसह पायाभूत सुविधांच्या उभारणीत त्यांचे योगदान मूलभूत आहे. त्यामुळे स्थापत्य अभियंत्यांनी नाविन्यता, जबाबदारी व कौशल्याची जोपासना करावी," असे मत जलसंपदा विभागाचे मुख्य अभियंता डॉ. हेमंत धुमाळ यांनी व्यक्त केले.

प्रेम, आनंद व ज्ञान वाटत स्थापत्य अभियंत्यांनी नाविन्याचा ध्यास, प्रयत्नांची पराकाष्टा, जिद्द आणि चिकाटीने यश मिळवत राहावे, असे आवाहनही त्यांनी केले. राष्ट्रीय अभियंता दिवसानिमित्त बिल्डर्स असोसिएशन ऑफ इंडियातर्फे (बीएआय) आयोजित कार्यक्रमात डॉ. धुमाळ बोलत होते. रेसिडेन्सी क्लब येथे झालेल्या कार्यक्रमाची सुरुवात भारतरत्न सर मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून झाली. बांधकाम क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल बी. जी. शिर्के उद्योग समूहाचे उपाध्यक्ष आर. बी. सूर्यवंशी व एसकॉन प्रोजेक्टसचे संस्थापक निलेश चव्हाण यांचा विशेष सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रायोजक श्रीकन्स्ट फ्रेमवर्कचे संचालक दीपक जगदाळे व सहकाऱ्यांचाही गौरव करण्यात आला. 'बीएआय' महाराष्ट्राचे अध्यक्ष जगन्नाथ जाधव, सचिव मनोज देशमुख, 'बीएआय' पुणेचे अध्यक्ष अजय गुजर, उपाध्यक्ष राजाराम हजारे व महेश मायदेव, सचिव सी. एच. रतलानी, खजिनदार महेश राठी आदी उपस्थित होते. आर. बी. सूर्यवंशी म्हणाले, "राष्ट्राच्या प्रगतीसाठी चांगल्या समाजाची निर्मिती व्हायला हवी. नागरिकांचे चारित्र्य स्वच्छ आणि त्यांना कर्तव्याची जाण असणे फार गरजेचे असते.

सहा दशकांहून अधिक काळ बी. जी. शिर्के उद्योग समूहाच्या माध्यमातून या क्षेत्रात योगदान देतो आहे. स्थापत्य, बांधकाम शास्त्राचे औद्योगिकरण करण्यात मला योगदान देता आल्याचे समाधान आहे. निश्चित केलेले ध्येय गाठण्यासाठी अपार कष्ट, सातत्य आणि नाविन्याचा ध्यास घ्यायला हवा, ही गोष्ट तरुण अभियंत्यांनी लक्षात घ्यावी."

## खेड तालुक्यात बैलपोळा उत्साहात साजरा

**राजगुरूनगर (दै. आरंभ पर्व)**

खेड तालुक्यात बैलपोळा सण मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. सणाचे औचित्य साधून आपल्या शेतात राबणाऱ्या सर्जा राजाच्या प्रती कृतज्ञतेचा भाव दाखवत व आनंदाने त्यांचे कोडकौतुक करत बैलांना पुरणपोळीचा घास शेतकऱ्यांनी भरविला. सणाचे साहित्य खरेदीसाठी येथील बाजारपेठेत शेतकऱ्यांनी प्रचंड गर्दी केली होती. आपल्या सर्जा-राजाप्रती असणाऱ्या भावना व्यक्त करणारा हा सण असल्याने वस्तूंचे दर गगणाला भिडले असतानाही शेतकरी राजाने मोकळ्या मनाने बैलपोळा साहित्याची खरेदी केली.

खेड तालुक्यात चास व तेथील काही वाड्या वगळता सर्वदूर भाद्रपदी बैलपोळा साजरा केला जातो. पश्चिम भागातील शेतकरी पूर्णतः शेतीवर अवलंबून असतात. यामुळे जवळपास सर्वच शेतकरी कुटुंबांकडे बैलजोडी असल्याचे पहावयास मिळते. वर्षातून एकदा येणारा बैलपोळा हा सण या भागांत मोठ्या उत्साहाने साजरा केला जातो. या भागात या सणाची सुरुवात आदल्या दिवसापासूनच होते.

## डॉ. कल्याण गंगवाल यांना राष्ट्रीय "श्रावक शिरोमणी शाकाहार रत्न" पुरस्कार प्रदान

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

दिगंबर जैन समाजाचे सुश्रावक, शाकाहार, जीवदया, अहिंसा यांचे प्रणेते डॉ. कल्याण गंगवाल यांना राष्ट्रीय "श्रावक शिरोमणी शाकाहार रत्न" हा पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. हा सन्मान आचार्य डॉ. शिव मुनिश्री यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. या प्रसंगी ऑल इंडिया श्वेतांबर स्थानकवासी जैन कॉन्फरन्सचे अध्यक्ष अतुल जैन, स्वागताध्यक्ष सुरेश लूणावत, सुभाष ओसवाल, अशोक मेहता, जयंतीलाल कुकडा, अशोक पगारिया आणि जैन कॉन्फरन्सचे महामंत्री डॉ. अमित राय जैन आदी मान्यवर उपस्थित होते.




डॉ. गंगवाल म्हणाले की, हा सन्मान माझा वैयक्तिक नसून शाकाहार, जीवदया, अहिंसा अभियानाचा गौरव आहे. गेले ५५ वर्षे जे कार्य मी करत आलो आहे, तेच कार्य माझ्या अंतिम क्षणापर्यंत मी करत राहो, असा परमेश्वराने मला आशीर्वाद द्यावे ! आयुष्याची ८१ वर्षे पूर्ण झाली, आता उर्वरित जीवनही भगवान महावीर यांचा संदेश जनमानसापर्यंत पोहोचविण्यात व्यतीत होवो, हीच माझी अंतिम मनोकामना आहे, अशा भावना डॉ. गंगवाल यांनी व्यक्त केल्या.


जैन श्वेतांबर स्थानकवासी संघाचे चतुर्थ पट्टाधीश आचार्य आत्मध्यानी महामुनिराज डॉ. शिव मुनि महाराज यांच्या ८४ वा जन्मदिन "प्रकाशोत्सव" म्हणून सूरत (गुजरात) येथे साजरा करण्यात आला!

या प्रसंगी श्री ऑल इंडिया श्वेतांबर स्थानकवासी जैन कॉन्फरन्सचे राष्ट्रीय अधिवेशन संपन्न झाले ! या अधिवेशनात संपूर्ण भारतभरातून ५०० पेक्षा अधिक पदाधिकारी सहभागी झाले होते.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर सोशल रिसर्च सेंटरचे बुधवारी शरद पवार यांच्या हस्ते उद्घाटन

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सोशल रिसर्च सेंटरचे उद्घाटन माजी केंद्रीय कृषिमंत्री खासदार शरद पवार यांच्या हस्ते, समता समाजवादी चळवळीचे मार्गदर्शक व ज्येष्ठ विचारवंत बाबा आढाव यांच्या अध्यक्षाखाली होणार आहे. हा उद्घाटन समारंभ येत्या बुधवारी (ता. २४) सायंकाळी ५.३० वाजता बालगंधर्व रंगमंदिर पुणे येथे होणार आहे, अशी माहिती अॅड. जयदेव गायकवाड यांनी पत्रकार परिषदेत दिली. प्रसंगी ज्येष्ठ पत्रकार अरुण खोरे, सेंटरचे उपाध्यक्ष विजय जाधव, दत्तात्रय गायकवाड, दीपक म्हस्के आदी उपस्थित होते. अॅड. जयदेव गायकवाड म्हणाले, "या उद्घाटन समारंभाचा एक भाग म्हणून भारतीय संविधान: संसदीय लोकशाहीपुढील आव्हाने' या विषयावर परिसंवादाचे आयोजन केले आहे. ज्येष्ठ विचारवंत डॉ. रावसाहेब कसबे, राजकीय अभ्यासक प्रा. डॉ. सुहास पळशीकर, महात्मा फुले समता प्रतिष्ठानच्या सरचिटणीस अॅड. शारदा वाडेकर यात सहभागी होणार आहेत.""बाबासाहेबांनी १९४६ ते १९४८ या तीन वर्षांच्या काळात आपल्या प्रकृतीची तमा न बाळगता जे भारतीय संविधान निर्माण केले आणि या देशातील लोकशाहीला बळ देणारा सामाजिक न्यायाचा पाया रचला. त्या संविधानावर आज काही फॅसिझमवादी शक्ती आक्रमण करू लागल्या आहेत. आजचे हे वर्तमान लक्षात घेता या सोशल सेंटरच्या माध्यमातून जिल्हा स्तरावर संविधान संरक्षण समिती स्थापन करण्यात येणार आहे," असे अॅड. जयदेव गायकवाड यांनी सांगितले. "डॉ. आंबेडकर सोशल रिसर्च सेंटरच्या माध्यमातून हा एक प्रमुख उपक्रम टप्प्याटप्प्याने राबवण्याचा आमचा मानस आहे. यासाठी जो थिंकटॅक आम्ही उभा करीत आहोत. त्याचे मार्गदर्शन या उपक्रमात प्राधान्याने देण्यात येईल. यात आपण सर्वांनी सहभागी व्हावे," असे अरुण खोरे यांनी नमूद केले. संविधानाची नैतिकता अधोरेखित करण्याचा आमच्या सामाजिक अभ्यास केंद्राचा प्रयत्न राहणार आहे. संयुक्त राष्ट्रसंघ (युनो) आणि बाबासाहेबांनी उच्च शिक्षण घेतले ते कोलंबिया विद्यापीठ आणि लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स या संस्थांशी समन्वय साधून अभ्यास प्रकल्पासंदर्भात चर्चा, संवाद करणे, यावर भर दिला जाणार आहे, असे विजय जाधव यांनी सांगितले.













दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले. संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) मा. श्री. लक्ष्मण साबळे (निवासी संपादक) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.